लोकमत

# पथनाट्यातून सायबर सुरक्षेचे नागरिकांना धडे!

लोकमत न्यूज नेटवर्क

**डोंबिवली** : सध्या सायबर गुन्ह्यांतून फसवणुकीचे प्रमाण वाढले आहे. मोबाईल, इंटरनेटचा आधार घेऊन भामट्यांकडून सर्वसामान्य व्यक्तींप्रमाणे उच्च शिक्षितांनाही लाखो रुपयांचा गंडा घातला जात आहे. प्रलोभनांना बळी पडू नका, आपली एक चूक पडू शकते महाग अशी सावधानता बाळगण्याच्या सूचना पोलिसांकडून वारंवार केल्या जात आहेत. वाढत्या गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर ठाण्यापाठोपाठ कल्याण, डोंबिवली ते बदलापूरपर्यंत पथनाट्यातून सायबर सुरक्षेचा संदेश दिला जाणार आहे. क्विक हिल फाउंडेशन, महाराष्ट्र सायबर सेल आणि ठाणे पोलिसांच्या संयुक्त विद्यमाने ही जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे.

योग इव्हेंट्स या संस्थेचे प्रमुख गौरव निमकर व योगेश शेट्ये यांच्या प्रतिनिधित्वाखाली तरुण कलाकारांची टीम 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' पथनाट्याद्वारे सायबर सुरक्षेचे गांभीर्य नागरिकांपर्यंत पोहोचवत आहे. ठाणे येथील महाविद्यालयांत याचे प्रयोग झाले. विद्यार्थी, प्राचार्य आणि शिक्षकांचा या उपक्रमाला चांगला प्रतिसाद लाभला. कल्याण-डोंबिवली, बदलापूर शहरांत या आठवड्यापासून पथनाट्यांचे प्रयोग सादर केले जाणार आहेत, अशी माहिती योग इव्हेंटसचे प्रमुख निमकर यांनी दिली.

Hello Thane
Page No. 3 Dec 20, 2021
Powered by: erelego.com